रयत शिक्षण संस्थेचे,

# सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर.

## सूचना क्र.4 (परीक्षा विभाग)

### एम.कॉम.भाग 1 व 2 ( 2023 आणि 2025 Pattern)

### परीक्षा ऑक्टोबर/नोव्हेंबर 2026

दि.17/10/2026

एम.कॉम.भाग 1 व 2 ( 2023 आणि 2025 Pattern) या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर/नोव्हेंबर 2026 साठी परीक्षा फॉर्म भरण्याच्या तारखा जाहीर केलेल्या आहेत.

ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्मवर प्रिंट झालेले विद्यार्थ्याचे नाव (बारावीच्या गुणपत्रानुसार), मोबाईल नंबर, आधार नंबर, Eligibility Number, ABC आयडी, ईमेल आयडी, विषय व स्वतःची स्वाक्षरी हे बारकाईने स्वतः पडताळणी करुन पहावे.

ऑनलाईन परीक्षा फॉर्म भरल्यानंतर Print Preview बटनावर क्लिक करुन डाऊनलोड झालेल्या परीक्षा अर्जाची प्रिंट आऊट काढून सदर फॉर्मसोबत विद्यार्थ्यांनी मागील सर्व सत्राचे गुणपत्रक जोडावे. सदर परीक्षा फॉर्म खालील यादीतील वर्गानुसार प्राध्यापकाकडून चेक करून सहया घेणे आवश्यक आहे.

| अ.नं. | वर्ग | प्राध्यापकाचे नाव |
|---|---|---|
| 1 | एम.कॉम.भाग 1<br>( 2023 आणि 2025 Pattern) | डॉ.गुजर पी.एस.<br>प्रा.जेजुरकर एम.एस. |
| 2 | एम.कॉम.भाग 2<br>( 2023 आणि 2025 Pattern) | प्रा.तांबडे डी.पी.<br>प्रा.ठोके आर.एम. |

वरील प्राध्यापकांच्या स्वाक्षरी घेतल्यानंतर कार्यालयात श्री. मोकळ पी.एन. /श्री. पलघडमल डी.पी. यांच्याकडून तो फॉर्म इनवर्ड करुन घ्यावा (ज्या दुष्काळग्रस्त पात्र विद्यार्थ्यांना शासन निमानुसार परीक्षा शुल्क माफ करुन घ्यायचे आहे त्यांचा परीक्षा फॉर्म Inward करतांनाच आवश्यक ती खाली नमूद कागदपत्रे कार्यालयात परीक्षा फॉर्मसोबत जमा करावी). त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतः चे विद्यापीठ लॉगीन करुन चलन जनरेट करुन कार्यालयात प्रिंट जमा करावी.चलन जनरेट करुन नव्याने तयार होणाऱ्या परीक्षा फॉर्मची व चलनाची प्रिंट ही संबंधित प्राध्यापकांकडे जमा करावी. सदर कार्यवाही विहित मुदतीत न केल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित विद्यार्थी स्वतः जबाबदार राहिल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन परीक्षा अर्ज व चलन जनरेट करुन संबंधित शिक्षकांकडे जमा करुन परीक्षा अर्जाची पूर्तता करावी.

परीक्षा फॉर्म भरण्याची अंतिम मुदत 22/10/2026 पर्यंत आहे. विहीत मुदतीत परीक्षा फॉर्म न भरणा-या विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

C.D. JAIN COLLEGE OF COMMERCE, Shrirampur

University Table/E/C.D.Jain College /Shri Gunjal S.V./Exam Notice

Scanned with OKEN Scanner

अ) परीक्षा फॉर्म महाविद्यालयात Inward करतांना परीक्षा फॉर्म फी शून्य होण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी.

1. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिलेले विहित नमुन्यातील स्वयंघोषणापत्र
2. उत्पन्नाचा दाखला (मा. तहसिलदार) यांनी दिलेला [ ज्या विद्यार्थिनींच्या पालकांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाख मर्यादेपर्यंत आहे. असेच विद्यार्थी सदर योजनेस पात्र आहेत.] [सेल्फ अटेस्टेड झेरॉक्स प्रत]
3. रहिवाशी दाखला / डोमासाईल प्रमाणपत्र [सेल्फ अटेस्टेड झेरॉक्स प्रत]

ब) ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव परीक्षा अर्ज Inward करतांना परीक्षा शुल्क शुन्य करण्यासाठी आवश्यक कागदपत्रकांची पूर्तता करण्यासाठी अडचणी येत असतील अश्या विद्यार्थ्यांनी कार्यालयात संपर्क साधावा.

महाविद्यालय परीक्षा अधिकारी

C.D. JAIN COLLEGE OF COMMERCE, Shrirampur

प्राचार्य
सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स
श्रीरामपूर

University Table/E/C.D.Jain College /Shri Gunjal S.V./Exam Notice

Scanned with OKEN Scanner